# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ०३-२३** **दिनांक ०३/०१/२०२३**

## Work From Home च्या नावाखाली फसवणूक करणा-या आरोपीस पकडण्यात सायबर गुन्हे कक्षास यश.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. चेतन रा. ग्लोबल सिटी, विरार (प) ता. वसई, जि. पालघर यांनी यु टयुबवर घरी बसून पैसे कमविण्याबाबत जाहिरात पाहिली. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या टेलीग्राम चॅनलवर पाहणी केली असता त्यामध्ये काही रक्कम भरुन टास्क विकत घेतल्यास चांगला नफा मिळतो असे आमिष दाखविण्यात आले. तक्रारदार यांनी रक्कम भरल्यानंतर सुरवातीला काही रक्कम त्यांना मिळाली. असे करता करता तक्रारदार यांनी एकूण ११,२५,०००/- रुपयांची गुंतवणूक केली. त्यानंतर त्यांना कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची फसवणूक झाल्याबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त झाला होता.

सदरची तक्रार प्राप्त होताच तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेची सायबर सेफ पोर्टलवर माहिती घेतली असता सदरची रक्कम संशयीत आयडीएफसी बँक खात्यावर गेल्याचे दिसून आले. त्याबाबत माहिती प्राप्त करुन विश्लेषन व तांत्रिक चौकशी करुन संशयित आरोपीस ताब्यात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता त्याने सदरचा प्रकार केल्याचे कबुल केले. संशईत याने त्याचे आयडीएफसी बँक खाते तपशील :- १००६१४४३४४८ आर्या फुड कॅन्टीन रा. 8TH FLOOR AIR INDIA BUILDIN, INCOME TAX OFFICE, NARIMAN POINT, Mumbai 400021, MAHARASHTRA INDIA यावर पैसे मागवून घेतले. सदर घटनेबाबत अर्नाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ०२/२०२३ भादंविस कलम ४२०, ३४ सह आयटी ॲक्ट ६६ (क), ६६ (ड) प्रमाणे दिनांक ०२/०१/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपी नामे अशोककुमार रामसमूज आर्या वय – २८ वर्षे यास अटक करण्यात आली आहे व अर्नाळा पोलीस ठाणे येथे पुढील तपास सुरु आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Work From Home जाहिराती मध्ये गुंतवणूकीवर विश्वास ठेवू नये.**
- **अधिक नफा मिळण्याचे आमिष दाखविणा-या जाहिरातीपासून सावधान रहावे.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूकीचा प्रकार आपल्या सोबत घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त-गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोहवा/१२१०७ माधूरी धिंडे , पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, मसुब १९१२०६० आकाश बोरसे, मसुब २०१३१७५ दिपक पाटील यांनी पार पाडली आहे.

--------------ooooo--------------